# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,चंद्रपूर

## १. योजनेचे नांव :- स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना

**उद्देश :- दारिद्र्य रेषेखालील गरीब कुटुंबाना स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी सहाय्य करणे हे सहाय्य सामुहीक अथवा वैयक्तीक स्वरुपाचे राहू शकेल.**

**स्वरोजगारी निकष :-**

सुवर्ण जंयती ग्राम स्वरोजगार योजना कार्यक्रमाखाली कर्ज व अनुदान मिळण्यास खालील प्रमाणे पात्रता आवश्यक आहे.

* अर्जदार ग्रामीण भागात वास्तव्य करीत असावा.
* संबंधित पंचायत समिती किंवा ग्राम पंचायत कार्यालयात ठेवण्यात आलेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाच्या यादीत अर्जदाराचे नाव असावे.
* अर्जदारावर सरकारी अगर कोणत्याही संस्थेची कर्ज बाकी नसावी.
* अर्जदारानी बँकेने अगर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने वेळोवेळी घालून दिलेल्या अटी पूर्ण करण्याची तयारी असावी.
* अर्जदाराचे वय १८ वर्षाचे वर व ६० वर्षाचे आत असावे.

**लाभाचे निकष:-**

| अ.क्र. | लाभार्थ्याची वर्गवारी | अनुदानाची टक्केवारी | |
|---|---|---|---|
| १) | अल्प भुधारक २ हेक्टर पर्यंत | ३० % | रु. ७,५००/- |
| २) | अत्यल्प भुधारक १ हेक्टर पर्यंत | ३० % | रु. ७,५००/- |
| ३) | अनुसूचित जाती/जमाती/अपंग मग तो अत्यल्प किंवा अल्प भुधारक असो किंवा शेतमजूर/बिगर शेतमजूर/ ग्रामीण कारागीर असो. | ५० % | रु. १०,०००/- |

**सर्व साधारण योजनेकरीता वरील प्रमाणे रु ७५००/- व १००००/- रुपये ही अनुदानाची कमाल मर्यादा परंतु सिंचनाच्या सोयी करीता मात्र, कमाल मर्यादा नाही.**

- **अर्ज करण्याच्या पध्दती:-**

ज्या कुटूंबाचे नांव दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाच्या यादीत आहे त्या कुटूंबास अर्जाचा नमुना (फार्म) विनामुल्य ग्राम पंचायत मार्फत उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अर्जदाराने त्यांचे गावातील ग्रामसेवक, ग्राम विकास अधिकारी, अगर पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधून अर्ज प्राप्त करावा अर्जासोबत भरावयाची कागदपत्रे जोडलेली असतात. ती संबंधीत खात्याकडून भरुन घ्यावी.

* तलाठयाचा जमिन विषय दाखला, नमुना (७/१२ उतारा) जमीनी असल्यास.
* भु. विकास बँक व सेवा सहकारी बँक यांचा कर्ज विषयक दाखला.

वरील दाखल्यासह, अर्जदाराने आपली व्यक्तीगत माहिती भरुन ग्राम विकास अधिकारी ग्रामसेवक यांचेकडे द्यावी व अर्ज पूर्णपणे भरलेला आहे. किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी. आवश्यकता वाटल्यास त्यांची पावती घ्यावी.

## २. योजनेचे नांव :- इंदिराआवास योजना.

**उद्देश:-** **दारिद्रय रेषेखालील अनुसूचीत जाती/जमाती,मुक्त वेठबिगार आणि इतर ग्रामीण कुटुंबासाठी नविन घरकुल बांधकामासाठी एकमुस्त आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे.**

**घरकुलाचे स्वरुप :-** इंदिरा आवास योजने अंतर्गत नविन घरकुल बांधकाम करण्याच्या योजनेत बांधकाम किमान २५० चौ.फु. इतके असावे व त्यासोबत सौच्छालय, निर्धुरचुल व विद्युतीकरण या बाबीचा समावेश आहे.

**लाभाचे स्वरुप:-**

| | |
|---|---|
| एकूण प्रकल्प किंमत | :- रु. ३००००/- पैकी |
| केंद्र शासनाचा हिस्सा | :- रु. १८७५०/- |
| राज्य शासनाचा हिस्सा | :- रु. ६२५०/- |
| राज्य शासनाचा अतिरिक्त हिस्सा | :- रु. ३५००/- |
| लाभार्थीचा हिस्सा | :- रु. १५००/- |

### लाभार्थी निवडीचे निकष :-

**१) लाभार्थी ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील असावा.**

**२) सन २००६-०७ मधील बदललेल्या मार्गदर्शक सूचने नुसार- सन २००२ च्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीचा आधार घेवून घरे नसलेल्या कुटुंबाची कायमस्वरुपी प्रतिक्षायादी तयार करावयाची आहे. प्रतिक्षा यादीतील गुणा नुसार चढत्या क्रमाणे लाभार्थीची निवड करावयाची आहे.**

**३) सदर प्रतिक्षा यादीस ग्रामसभेची मान्यता आवश्यक आहे.**

**४) ६०% घरे अनुसूचीत जाती/जमातीच्या लाभार्थीना देण्यात येतील व इतरा करीता ४०% लाभदेण्यात येईल.**

- **लाभार्थी निवडी करीता प्राधान्य क्रम :-**
  - ✷ मुक्त वेठबिगार
  - ✷ जी कुटूंबे जुलूमाची बळी ठरलेली आहेत अशा अनु.जाती/जमातीमधील कुटूंबे
  - ✷ जी कुटूंबे दारिद्रय रेषेखालील आहेत. ज्या कुटूंबाच्या प्रमुख्र विधवा आणि अविवाहीत, घटस्फोटीत स्त्रिया आहेत. अशी अनु.जाती/जमातीमधील कुटूंबे.
  - ✷ नैसर्गीक आपत्तीमुळे नुकसान झालेले आहेत. अशी अ.जाती/जमातीची कुटूंबे
  - ✷ दारिद्रय रेषेखालील इतर अनु. जाती/जमाती व इतर कुटूंब
  - ✷ अपंग, युध्दभुमीवर विरगती प्राप्त झालेली कूटूंबे.

## ३. योजनेचे नांव :- राजीव गांधी ग्रामिण निवारा योजना क्रमांक १ व २

**उद्देश :-** राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील/ तसेच दारिद्रय रेषेवरील आर्थिक दृष्टया दुर्बल/बेघर/अल्पभुधारक गरजूसाठी ही योजना राबविण्यात येत आहे.

- **लाभार्थी निकष:-**

१. राजीव गांधी ग्रामिण निवारा योजना क्रमांक १ करीता लाभार्थी हा दारिद्रय रेषेखालील असावा तसेच क्रमांक २ करीता लाभार्थ्याचे वार्षिक उत्पन्न रु ५००००/- किंवा त्यापेक्षा कमी असावे.

२. लाभार्थ्याने यापुर्वी इतर शासकीय योजनेतून घरकुलाचा लाभ घेतला नसावा.

३. योजनेत ६०% घरकुले अनुसूचित जाती/जमाती करीता तसेच ४०% इतर मागासवर्गीय लाभार्थींना उपलब्ध करुन देण्यात येतील.

४. लाभार्थीचे नाव ग्रामसभेव्दारा मंजूर होवून प्रस्तावित होणे आवश्यक आहे.

५. योजनेत प्रकल्पग्रस्त,अपंगव्यक्ती,तसेच स्त्रियांना (विधवा घटस्पोटीत परितक्त्या स्त्रिया इत्यादींना प्राधान्य दयावयाचे आहे.)

- **लाभाचे स्वरुप:-**

योजना क्रमांक १ मध्ये प्रती लाभार्थी रु २८५००/-चे घरकुल लाभार्थ्यांना त्याचे कडील उपलब्ध जागेवर मोफत बांधून दयावयाचे आहे. ज्या लाभार्थ्याकडे जागाउपलब्ध नसेल अशा लाभार्थ्यांना घरकुलासाठी शासकीय/ग्रामपंचायतीच्या मालकीची/वाढीव गावठाने इत्यादी जमीन संबंधीत जिल्हाधिकारी विनामुल्य उपलब्ध करुन देतील.

योजना क्रमांक २ मध्ये रु ५००००/- चे घरकुल बांधून दयावयाचे आहे. यात लाभार्थ्याचा हिस्सा रु ५०००/- रोखीने/साहित्य रुपात अथवा मजूरी स्वरुपात दयावयाचा आहे. या योजनेत बांधलेल्या घरकुलात कुटुंबा व्यतिरिक्त इतर कोणालाही वास्तव्य करता येणार नाही. उर्वरीत रक्कम २०वर्षे परत फेडीच्या मुदतीवर बिनव्याजी कर्ज रुपाने उपलब्ध करुन देण्यात येईल व या रक्कमेवरील व्याजाची परतफेड शासन स्तरावरुन प्रतीवर्षी अंदाजपत्रकात तरतुद करुन संबंधीत वित्तय संस्थेस देण्यात येईल.

**अर्ज करण्याची पध्दती:-**

१. इंदिरा आवास योजनेच्या अर्जाचे नमुन्यात याही योजनेत लाभार्थींनी अर्ज ग्रामपंचायत /पंचायत समितीस्तरावर करावयाचा आहे.

२. अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे.
दारिद्रय रेषेखाली असल्याबाबत प्रमाणपत्र
शिधावाटप पत्र
इतर योजनेतून घरकुल न घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र
योजना क्रमांक २ करीता रु ५००००/- किंवा त्यापेक्षा कमी असल्याबाबत उत्पन्नाचा दाखला(तलाठी,तहसिलदार,सचिव ग्रामपंचायत)

## ४.   योजनेचे नांव  :-  अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम

<u>योजनेची आवश्यकता:</u> दुष्काळाची झळ कमी करण्यासाठी  अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रमाची आवश्यकता  आहे.

■ **उद्देश**

वरील नमुद केलेल्या परिस्थितीत विशिष्ट उद्देश ठेवून पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे.

✷ ग्रामीण भागातील ग्रामीण क्षेत्रावर अवलंबून असलेल्या जनतेचा खालीलप्रमाणे उपाय योजना करुन आर्थिक विकास वृध्दींगत करणे.

अ)  जमीन, पाणी, झाडी, झुडपे इ.सारख्या पाणलोट क्षेत्रातील नैसर्गीक साधन संपत्तीचा कमाल वापर करुन अवर्षणाचे प्रतिकुल परिणाम सौम्य करणे व पर्यावरणाची भविष्यातील घसरण रोखणे.

ब)  मानवी विकास व आर्थीक विकास होण्यासाठी स्थानिक पातळीवर उद्योग उपलब्ध करुन देणे, जेणे करुन काही प्रमाणात बचत करुन आर्थीक विकास साधता येवू शकेल.

✷ ग्रामीण भागातील पर्यावरणाचा समतोल कायम राखण्यास प्रवृत्त करणे.

अ)  प्रकल्पाची प्रचलन करण्यात आलेल्या मत्ता यांची देखभाल करण्यासाठी जनतेचा कायम स्वरुपी सहभाग आणि पाणलोट क्षेत्रातील संपत्तीचा अव्याहत निर्मित ठेवणे.

ब)  पाणलोट क्षेत्रातील साधन संपत्ती उपभोग करुन घेण्यासाठी सर्व सोपे तंत्रज्ञान वापरात आणण्यासाठी कायम स्वरुपी सस्थेची निर्मिती करणे.

✷ मत्ताहिन दुर्बल घटक, स्त्रिया आणि तुटपंजी असणा-या पाणलोट क्षेत्रातील व्यक्तींचा आर्थीक व सामाजिक विकास करणे.

अ)  पाणी व जमीन साधनसंपत्ती  विकासामुळे मिळणा-या फायद्याच्या बाबीचा तसेच त्यापासून पुढेही मिळत राहणा-या उत्पन्नाचे न्यायसंगत वाटप करणे.

ब)  उत्पन्न निर्मितीच्या संधीसाठी अधिक वाव देणे, त्यांच्या मानवी साधन संपत्तीच्या विकासावर लक्ष केंद्रीत करणे.

■ **वर्ष निहाय निधी वितरण निकष  :-**

अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम विकासासाठी स्वंतत्र कार्यक्रम म्हणून राबविता सर्वसाधारणपणे ५०० हेक्टर क्षेत्रफळ असलेल्या एका लघु पाणलोट क्षेत्रामध्ये संयुक्त प्रकल्प राबविण्यात येत आहे. एका प्रकल्पासाठी रु. ३०.०० लाखची तरतुद आहे वर्षनिहाय प्रयोजन खालीलप्रमाणे आहे.

| ***प्रथम वर्ष*** | ***(रु. लाखात)*** |
|---|---|
| प्रथम वर्ष | ३.०० |
| व्दितीय वर्ष | ४.५० |
| तृतीय वर्ष | ९.०० |
| चतुर्थ वर्ष | ९.०० |
| पंचम वर्ष | ४.५० |
| एकूण | ३०.०० |

यात शासनाचा सहभाग केवळ निधी उपलब्ध करुन देणे, संनियत्रण करणे एवढाच असुन सदर कार्यक्रम गावक-यांनी राबवावयाचा आहे.

विकास कार्यात सहभागी होण्यासाठी व यात आपलेपणाची जाण राहावी म्हणून प्रकल्प अंतर्गत सार्वजनिक जमिनीवरील कामे करीत असतांना **५ टक्के श्रमदान** व खाजगी जमिनीवरील कामे करीत असतांना **लोकवर्गणी १० टक्के** म्हणून घ्यावयाची असते. (अनु.जाती/जमाती) दारिद्रय रेषेखालील **लोकांचा सहभाग ५ टक्के** अशा त-हेने जमलेला निधी प्रकल्पावर खर्च न करता तो **स्वंतत्र पाणलोट क्षेत्र निधी** म्हणून समजण्यात येईल. त्या रक्कमेचा उपयोग तयार होणा-या मालमत्ता वर कायमस्वरुपी परिचलन व दुरुस्तीसाठी उपयोगात आणावयाचा आहे. जे ग्रामस्थ अशी वर्गणी देण्यास तयार असतील त्याच गावाची निवड या कार्यक्रमात करावयाची आहे.

## ५. योजनेचे नांव :- अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम
## (हरीयाली मार्गदर्शक सूचना)

<u>योजनेची आवश्यकता</u> : दुष्काळाची झळ कमी करण्यासाठी अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रमाची आवश्यकता आहे.

**उद्देश :-**

**हरियाली चा उद्देश पंचायती राज संस्थांना शासनाच्या जलसंधारण विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय आणि आर्थिक अधिकार देणे व त्यांचे मार्फत कार्यक्रम राबविणे.**

१. ग्रामीण भागातील जनतेला उत्पन्नाचे नियमित साधन उपलब्ध करुन देण्या करीता सिंचनाची व्यवस्था करणे ज्याव्दारे फलोद्दांन,चाराउत्पादन,मत्स्यपालन इत्यादी व्यवस्था करणे. तसेच पिण्याची उपलब्धते करीता पावसाव्दारे पडणारे पाणी संग्रह करणे.

२. ग्राम पंचायतीव्दारा ग्रामीण क्षेत्राचा संपूर्ण विकास तसेच पावसाचे पाणी संग्रह करुन त्याचे प्रबंधन व व्यवस्थापणाव्दारे ग्राम पंचायतीच्या उत्पन्नाचे नियमित साधने निर्माण करणे.

३. प्रकल्पासाठी सुक्ष्म पाणलोटाची निवड करतेवेळी गाव हा मुलभुत आधार धरावयाचा आहे.

४. ५०००-६००० हेक्टरचे पाणलोट/गांवसंकुल एक किंवा एकापेक्षा जास्त सलग्न असलेल्या गटामध्ये पाणलोट क्षेत्र राहील.

# ६. योजनेचे नांव :- अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम
## (हरीयाली मार्गदर्शक सूचना)

**योजनेचे संक्षिप्त विवरण** :- १.४.२००३ नंतर कार्यान्वीत होणारे नविन प्रकल्प हरीयाली मार्गदर्शक सचूना नुसार कार्यान्वीत करावयाच्या आहेत. हरियाली चा उद्देश पंचायती राज संस्थांना शासनाच्या जलसंधारण विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय आणि आर्थिक अधिकार देणे व त्यांचे मार्फत कार्यक्रम राबविणे हा आहे. जिल्हयातीती १.वरोरा २.गोंडपिपरी ३.पोंभुर्णा ३.राजूरा ४.कोरपणा ५.जिवती या तालुक्यांमध्ये प्रकल्प राबविल्या जात आहे.

हरियाली अंतर्गत प्रकल्पाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. ग्रामीण भागातील जनतेला उत्पन्नाचे नियमित साधन उपलब्ध करुन देण्या करीता सिंचनाची व्यवस्था करणे ज्याव्दारे फलोद्दांन,चाराउत्पादन,मत्स्यपालन इत्यादी व्यवस्था करणे. तसेच पिण्याची उपलब्धते करीता पावसाव्दारे पडणारे पाणी संग्रह करणे.

२.ग्राम पंचायतीव्दारा ग्रामीण क्षेत्राचा संपूर्ण विकास तसेच पावसाचे पाणी संग्रह करुन त्याचे प्रबंधन व व्यवस्थापणाव्दारे ग्राम पंचायतीच्या उत्पन्नाचे नियमित साधने निर्माण करणे.

३. प्रकल्पासाठी सुक्ष्म पाणलोटाची निवड करतेवेळी गाव हा मुलभुत आधार धरावयाचा आहे.

४. ५०० हेक्टरचे पाणलोट/गांवसंकुल एक किंवा एकापेक्षा जास्त सलग्न असलेल्या गटामध्ये पाणलोट क्षेत्र राहील.

■ **वर्ष निहाय वितरण होणारा निधी :-**

अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम विकासासाठी स्वंतत्र कार्यक्रम म्हणून राबविता सर्वसाधारणपणे ५०० हेक्टर क्षेत्रफळ असलेल्या एका लघु पाणलोट क्षेत्रामध्ये संयुक्त प्रकल्प राबविण्यात येत आहे. एका प्रकल्पासाठी रु. ३०.०० लाखची तरतुद आहे वर्षनिहाय प्रयोजन खालीलप्रमाणे आहे.

| *प्रथम वर्ष* | *(रु. लाखात)* |
|---|---|
| प्रथम वर्ष | ४.५० |
| व्दितीय वर्ष | ९.०० |
| तृतीय वर्ष | ९.०० |
| चतुर्थ वर्ष | ४.५० |
| पंचम वर्ष | ३.०० |
| एकूण | ३०.०० |

यात शासनाचा सहभाग केवळ निधी उपलब्ध करुन देणे, संनियत्रण करणे एवढाच असुन सदर कार्यक्रम गावक-यांनी राबवावयाचा आहे.

योजनेचे निकष (अटी/शर्ती):- योजना सामुहीक स्वरुपाची असल्यामुळे लागू नाही

## ७. योजनेचे नांव : एकात्मिक पडीक जमिन विकास कार्यक्रम

योजनेचे संक्षिप्त विवरण :- एकात्मिक पडीक जमिन विकास कार्यक्रम चद्रपूर जिल्हयातील

१.सिंदेवाही २.मुल ३.पोंभुर्णा ४. वरोरा या तालुक्यात राबविल्या जात आहे. या पैकी फक्त मुल तालुक्यात प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आला असून १० पाणलोटाचे काम प्रगती पथावर आहे. सदर प्रकल्पा करीता कार्यान्वयन यंत्रणा म्हणून सामाजिक वनिकरण विभागा काम करीत आहे. योजनेचे उद्देश व निकष अवर्षण प्रवण क्षेत्रविकास कार्यक्रमा प्रमाणे आहेत.

**साधारणतः ५०००-६००० हेक्टर क्षेत्रामध्ये १० ते १२ पाणलोटाचा समावेश असतो. याकरीता मिळणारी निधी** केंद्र रु ५५००/-प्रति हेक्टर व राज्य रु ५००/-प्रति हेक्टर या प्रमाणात निधी वितरीत करते. .

# ८.   योजनेचे नांव :-  राष्ट्रीय सम विकास योजना

**योजनेचा उद्देश :-**

मागास भागात विकासात्मक कार्यक्रम राबवून क्षेत्रीय असमतोल दुर करणे, विकासाला गती देणे.

**योजनेचे स्वरुप :** १००% केंद्र पुरस्कुत योजना.

प्रकल्प कालावधी ३ वर्षाचा मास्टर प्लॅन असून त्यामध्ये प्रत्येक वर्षि घेण्यात येणा-या कामाचा कृतिआराखडा तयार करण्यात आला आहे.

- **वितरीत होणारा निधी:-**

प्रत्येक वर्षिक रु १५.०० कोटीचा केंद्रीय निधी राज्य सरकार मार्फत जिल्हयास प्राप्त होतील.

- **योजनेची वैशिष्टे:-**

१. जल व्यवस्थापन व भुमिसुधारणेची कामे.
१. आरोग्य विषयक पायाभुत सुविधांचे बळकटीकरण.
२. शैक्षणीक विषयक पायाभुत सुविधांचे बळकटीकरण.
३. व्यवसाय शिक्षणाच्या सुविधा पुरविण्यासाठी पायाभुत सुविधा पुरविणे.
४. कृषि व पशुसंवर्धन विषयक बाबींच्या उत्पन्नात भरघालण्या करीता सुविधा बळकट करणे.
५. ग्रामीण विद्दुतीकरण तसेच ग्रामीण रस्त्यांचे जाळे पसरविण्या करीता सुविधा पुरविणे.
६. १५% निधी आरोग्य,शिक्षण व पशुसंवर्धन क्षेत्रातील मत्ता देखभाली करीता उपलब्ध करणे.
७. नक्षलग्रस्त भागसाठी एकूण नियतव्ययाच्या ७.५% निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.यात प्रामुख्याने पोलीस विभागाचे बळकटी करणे,रस्ते,पुल इत्यादी सुविधा पुरविण्यात येईल.
८. वैयक्तीक लाभांच्या योजना मध्ये अनुसूचीत जाती/जमातीच्या लोकसख्येच्या प्रमाणा नुसार ५०% अनुसूचीत जाती/जमातींना लाभ दयावयाचा आहे.

# ९.  योजनेचे नांव  :-  ट्रायसेम

ट्रायसेम योजना राज्य शासन व जिल्हा परिषद यांच्या ८५:१५ सहभागातून राबविल्या जाते.

**योजनेचा उद्देश** :- ग्रामीण भागातील बेरोजगार युवकांना तांत्रिक प्रशिक्षण उपलब्ध करुन त्यांना रोजगार व स्वयंरोजगार मिळवून देणे.

**प्रशिक्षणार्थी निवडीचे निकष :**

१) प्रशिक्षणार्थीचे वय १८ ते ३५ दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील युवक-युवती.

२) सदर प्रशिक्षण दारिद्रय रेषेखालील व दारिद्रय रेषेवरील कुटूंबातील युवक-युवतींना देण्यात येते.

३) दहावी पास व नापास

४) सेवायोजन नोंदणी क्रमांक धारक

५) कोणत्याही बँकेचे थकीतदार नसलेले

**प्रशिक्षणार्थीना मिळणारे लाभ :**

१) दारिद्रय रेषेखालील युवक-युवतींना प्रशिक्षण कालावधीत मासीक रु.५००/- विद्यावेतन दिल्या जाते.

२) प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केल्यानंतर रु ८००/- ची टुल किटस् मोफत दिल्या जाते.

३) प्रशिक्षणार्थीची परिक्षा महाराष्ट्र राज्य, व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ, मुंबई यांच्या मार्फत घेतल्या जाते व उत्तीर्ण होणा-या प्रशिक्षणार्थीस शासनामार्फत प्रमाणपत्र देण्यात येते.

४) प्रशिक्षण पूर्ण केलेल्या व स्वयंरोजगार करु इच्छिणा-या युवक-युवतींना स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेमार्फत कर्ज व अनुदान उपलब्ध करुन दिल्या जाते.

**प्रशिक्षण शुल्क :**

१) दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील युवक-युवतींना प्रशिक्षण मोफत दिल्या जाते.

२) दारिद्रय रेषेच्या वरील कुटूंबातील युवक-युवतींना रु ५०/- प्रती माह प्रशिक्षण शुल्क आकारण्यात येते. परिक्षा फी रु ३३०/- प्रशिक्षणार्थी आकारण्यात येते.

३) दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील युवक-युवतींना परिक्षा फी रु ३३०/- आकारल्या जाते.

**प्रशिक्षण केंद्राचे ठिकाण व शिकविल्या जाणारे व्यवसाय :**

**मिनी आय टी आय, सावली**

१. दुचाकी वाहन  २. वेल्डींग  ३. घरगुती विद्युत उपकरणे दुरुस्ती

**ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र, चंद्रपूर येथे**

१. सुतारकाम  २. इले. मोटार रिवायडींग  ३. वायरमन  ४. रेडिओ टिव्ही दुरुस्ती.

**प्रशिक्षणार्थी निवडीच्या पध्दती :**

प्रशिक्षण घेवू इच्छिूक युवक-युवतींनी संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे विहित नमुन्यात अर्ज सादर करावा. अर्जाचा नमुना विनामुल्य पुरविल्या जातो.